# स्त्रीलोकगीतातील स्त्रीमनाचा शोध (इंदापूर तालुका)

**प्रा. डॉ. महादेव पंढरीनाथ वाळुंज**
**'शिवनेरी'**, लक्ष्मीमाता मंदिराजवळ,
अंबिकानगर, मु.पो,ता. इंदापूर
जि. पुणे 413 106.
मो. 9890922197 /7588034729.

**01) प्रस्तावना :–**

इंदापूर तालुक्यातील स्त्रीलोकगीतांमधील स्त्रीमनाचा शोध घेतला असता. ही स्त्री धार्मिक, श्रद्धाळू असल्यामुळेच देवदेवतांची पूजा करण्यात, त्यांचे गुणगाण गाण्यात तिचे मन गुंतलेले दिसते. विशेषतः राम–सीता, राधा–कृष्ण, षंकर–पार्वती, विठ्ठल–रूक्मिणी, ज्ञानोबा, तुकाराम, मारूती, तुळस इत्यादिंना ती आपल्या दैनंदिन जीवनात महत्त्व देताना आढळते. ती मुळात कष्टकरी आहे. आपल्या कुटुंबासाठी रात्रंदिन कष्ट करताना दिसते. आपल्या सासर, माहेरच्या माणसांविषयी आदर असणारी आहे. अतिशय सोशिक, धार्मिक जीवन जगणारी आहे, त्यामध्ये आनंद शोधणारी, कुटुंबाला आनंदी ठेवण्यासाठी धडपडणारी पहावयास मिळते.

**02) स्त्रीलोकगीतांमधील स्त्रीमनाचा शोध :–**

जात्यावरील ओव्यांमध्ये स्त्रीमनाचे हुंकार, तिच्या अंर्तमनातील भावनाच व्यक्त झाल्या आहेत. स्त्रीमन हे अतिशय हळवं आणि कृतज्ञ असलेले दिसते. आईचे नाते म्हणजे तिच्यासाठी फारच जिव्हाळयाच म्हणून तिच्या कश्टाची, श्रमाची, त्रासाची, उपकाराची जाणिव तिच्याइतकी कुणालाच असू शकत नाही. आणि आईचे हे उपकार फेडताच येणार नाही असे आहेत. म्हणून ती म्हणते–

**"शेजीचं उसनं आल आदुली पायली, मातेच्या उसन्याची याद कुणाला राहिली।**
**शेजीचं उसनं माझ्या उंब–यापासून, मातेचं उसनं हाय जलमापासून ।**
**शेजीचं उसनं मी फेडीते काठोकाठी, मातेचं उसनं माझ्या भिडलं हाडोहाडी।** [1]

**किंवा**

**"आईचं उपकार कवा फेडशील जीवा ।**
**हाताचा पाळणा केला नेत्राचा दिवा । "**[2]

शेजारणीचं उसनं आदुली–पायली म्हणजे ग्रामीण भागातील धान्य मोजन्याची माप, आदुली म्हणजे अडीच किलो धान्य बसणारं छान घडवलेले पत्र्याचं माप तर दोन आदुली म्हणजे एक पायली, ते आपण ज्याचं घेतलं त्याचं पुन्हा काठोकाठ माप भरून काळजीने परत करतो पण आईच्या उपकारांची कुणाला आठवण नाही. आणि त्याच मोजमाप करता येणार नाही. तिचे ऋण जन्मापासूनच आहे आणि ते आपल्या सर्वस्वात सामावून गेलं आहे, ते फेडता न येणारं आहे. हाताचा पाळणा आणि नेत्राचा दिवा केला तरी आईचे उपकार फेडता येणार नाही अशी कृतज्ञतेची भावना आणि आईचे गुणगाण गाताना थकतच नाही. आपल्या आईबद्दल अभिमान, स्वाभिमान बाळगणार स्त्रीमन तिच्या कामसूपणाची माहिती देताना गर्वाने म्हणते–

**"काय काय गं काम, करीन जाता जाता। व्हती वाघीणं माझी माता ।।**
**दळनं कांडणाला, नाही कुणाला हार गेली। जात वडीती वडीती, जसं हरान पळतं "** [3]

आई असलेल्या स्त्रीला आपल्या मुलीची खूप ओढ आहे. आणि तिच्या आपल्यावरील प्रेमाचा, मायेचा आधार वाटतो म्हणून ती म्हणते–

**" सुकली, कोम्याली मला कोण म्हणीलं, पोटीची मैना माझी, माझ्या जीवाला जाणील।"**[4]

आपलं दुःख आपल्या मुलीलाच कळू शकतं. तिचं आपली मायेनं चौकशी करेल असा विश्वास आई असलेलं हे स्त्रीमनं व्यक्त करते आहे.

मुलीला जन्म देवून काय फायदा? कारण आपल्या पुरूषप्रधान समाजरचनेत मुलगी ज्यांच्या पोटी जन्म घेते, त्यांची सेवा तिच्या हातून घडू शकत नाही. आणि आई वडीलांच्या घरी तिचा शेवट लागू शकत नाही. संपूर्ण

आयुष्य ती त्यांच्या घरी काढू शकत नाही. या सगळया भावना स्त्री व्यक्त करते आहे. आणि नकळतपणे स्त्रीवर असणा–या बंधनांचा आणि इथल्या अन्यायकारक विषमतेवर आधारीत पुरूषप्रधान समाजरचनेचा निर्देश करते आहे.

आईबद्दल ओढ असलेल्या स्त्रीमनाला आपल्या भावाचा देखील सार्थ अभिमान आणि मोठा आधार वाटत असतो, म्हणूनच भावाच्या शेतासाठी पावसाला येण्याची ती विनवणी करते. त्याच्या सुखासाठी प्रार्थना करते. आपल्या भावावरचं आपला हक्क असतो, इतरांच्या नाही हे वास्तव देखील मांडते. आपल्या माहेरच्या माणसांबद्दल अतिशय अभिमान बाळगताना दिसते. आपल्या भावाची पत्नी म्हणजे भावजय आपल्यासाठी परकी असली तरी आपल्या भावासाठी भावाची पत्नी म्हणून तिला मोठेपण दयायला हवे असा अतिशय समंजसपणा ती दाखवते अशी ती अतिशय विचारी दिसते. आपल्या भावामुळेच भावजयीला शोभा आहे हेही सांगायला विसरत नाही म्हणून ती म्हणते–

**''मणी डोरल्याची मंगळसुतराला झेलनी। माझ्या बांधवाच राज तुला दंडत मालन।**
**बंधु ग आपला, सीता मालन माजी कोनं?। आपल्या बंधुसाठी तिला दयायचं मोठेपणं।''** [5]

त्याचबरोबर भावाचे लग्न होवून भावजयीच्या येण्यामुळे भाऊ बदलतो आहे हे लक्षात आल्यावर भावाला आपल्यातील नात्याची आठवण करून देतान, त्याला सुनावते की,

**''बहिण–भाऊ एका वेलाची वाळकं, आली भावजय राणी, नाही राहिली ओळख।''** [6]

बहिण भाऊ ही एकाच वेलाची वाळकं म्हणजे एकाच आई–वडीलांपोटी जन्मलो आहोत, आपलं रक्ताचे नाते आहे, ते तोडता येणार नाही असा यातील भाव आहे. तसेच आपल्या लहान भावाची काळजी वाहणारं स्त्रीमन अतिशय हळवं असलेले पहावयास मिळते.

**''वाटवरला वड वड गोंडाळया पानाचा। तुम्हा सयाला सांगू किती, बंधु कवळया मनाचा।।**
**वाटवरला वड त्याची वटती छत्रछाया। ज्याची त्याला माया कशी लावली देवराया।।''** [7]

वाटेवरील वडा सारखी त्याची छत्रछाया आपल्यावर आहे. ती म्हणते देवा तुझी काय किमया आहे की रक्ताच्या नात्यातील माणसांना एकमेकांची ओढ, माया निर्माण केली आहे. ज्याला त्याला आपल्या माणसांची ओढ आहे. तशीच आपल्या भावाला आपली ओढ आहे आणि आपल्यालाही त्याची ओढ आहे असे ही बहीण सांगते आहे.

स्त्रीच्या समजदार, विचारी मनाचा प्रत्यय सासरचे वर्णन असणा–या जात्यावरील ओव्यांमधून येतो.

**''सासू आत्याबाई तुमची सोन्याईची नीरी। जन्म जाऊ दे माझ्या कुकाईची चिरी।।**
**सासू–सासइरा कृष्ण देवाच्या मूर्ती। दीर माझा गणपती, जाऊ माजी धुरपती।।**
**नणंद माझी पारबती, एवढया गोतामधी। माझ्या चुडयाला शोभा किती।।''** [8]

आपला जन्म, संपूर्ण आयुष्य सासरी जावं अशी तिची ओढ आहे. ती म्हणते माझे सासु–सासरे, जावा, दीर, नणंद ही सासरची सर्व मंडळी अतिशय चांगली आहेत. या सर्वांनी घर भरलेले असल्यामुळेच माझ्या सासरी वावरण्याला षोभा आहे. आणि म्हणून जात्यावर बसल्यावर मी या सर्वांचे गुणगान गाते आहे. अशीच आणखी एका ओवीत एकत्र कुंटुंबाची ओढ व्यक्त झाली आहे. ती म्हणजे

**''हवसं मला मोठी, दीरा भायात नांदायाची। माडी कौलारू बांधायाची।''** [9]

एकत्र कुटुंबाची ओढ असणारी ही स्त्री एकत्र कुटुंबाचे महत्त्व आणि फायदे देखील सांगते आहे. एकत्र कुटुंबात राहिलो तरच प्रगती होईल, कौलारू घराची माडी बांधणे शक्य होईल. जुन्या काळी कौलारू माडीचे घर हे फार थोडया श्रीमंत लोकांना बांधणे शक्य होते. म्हणून आपणास श्रीमंत व्हायचे असेल, प्रगती करावयाची असेल तर एकत्र कुटुंबात राहणे आवश्यक आहे. म्हणून या गीतातील स्त्री म्हणते की, आपल्याला दीरा भायात राहण्याची ओढ आहे, हौस आहे.

स्त्री अतिशय विचारी आहे म्हणूनच बरोबरीला आलेल्या मुलाकडे सर्व कारभार सोपविते आहे आणि मार्गदर्शकाच्या भूमिकेतून त्याला मार्गदर्शन करताना सांगते की, बारकाईने, काटकसरीने संसार केला तरच तो सोन्यासारखा होईल, यशस्वी होईल. प्रत्येकाने आपल्या मुलाबाळांसाठी सर्व जतन करून ठेवणे, त्यात भर घालणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने सर्वांनी प्रयत्न करावा असेही सांगते आहे.

याबरोबरच आपल्या बाळाला कुणी नावे ठेवलेली तिला सहन होत नाही. मुलगा मुलगी असा भेदभाव देखील तिला मान्य नाही. मुलापेक्षा मुलगी कशातच कमी नाही असे ती अतिशय अभिमानाने सांगते आहे. आपली मुलगी केवळ हिरा नसून ती हिरकणी म्हणजे अतिशय शूर आणि धाडसी आहे असे गौरवाने ती म्हणते. त्याचबरोबर या स्त्रीमनाला शिक्षणाचेही महत्त्व पटलेले आहे म्हणूनच ती आपल्या मुलांनी शाळेत जावं, त्यांना

इंग्रजी यावं, त्यांनी इंग्रजी साहेबांसारखे बोलावे म्हणून ती शिक्षकाला गुरूदक्षिणा दयायला तयार आहे. अशी स्त्री बाळाच्या स्वभावामुळे त्याची सतत काळजी करतानाही दिसते. एकंदरीत आपलं कुटुंब, आपला परिसर आणि आपली संस्कृती याच्याशी ती एकरूप झालेली पहावयास मिळते.

स्त्री लोकगीतातून दिसणार स्त्रीमन अतिशय प्रेमळ, मायाळू आहे. तिला स्वतःच्या माणसांची जशी काळजी वाटते, तशीच तिची श्रद्धा असणा–या विठ्ठलाबद्दलही तिचे मन काळजी करताना दिसते. म्हणूनच ती अगदी उत्स्फूर्तपणे म्हणते–

**''विटेवरी उभा युगे झाल्याती अठ्ठावीस। सावळया विठ्ठलाला कुणी म्हणना खाली बस।''** [10]

अशीच काळजी, चिंता तिचं मन तुकोबांबद्दलही करताना दिसते. ती म्हणते–

**''साधु म्हण साधु झाल्याती घरोघरी। तुका गेला वैकुंठाला आले का कोणी बरोबरी।।**
**देहूच्या माळावरी समय जळते धाकटी। तुका गेला वैकुंठाला, जिजा राहिली एकटी।''** [11]

अशी ही स्त्री प्रेमळ मायाळू आहे. तशीच ती अतिशय संस्कारशील असलेली पहावयास मिळते. म्हणूनच ती म्हणते सकाळच्या वेळी अगोदर रामाचं नाव घ्यावं, सकाळी सर्वत्र स्वच्छता करावी, त्यातच राम आहे. म्हणजे स्वच्छता हाच ईश्वर आहे, अशी तिची भूमिका आहे. आपण सकाळी उठतो आहोत ही रामाचीच कृपा आहे आणि ही धरणीमाता आपले पालनपोषण करते तिचे ऋण लक्षात ठेवायला हवे म्हणून तिच्यावर पाय ठेवण्यापूर्वी रामाचे नाव घ्यावे अशी भावना ती व्यक्त करते. रामायण कथेतील राम–सीता, लक्ष्मण यांना सहन कराव्या लागलेल्या वनवासाने ती हळहळते, दुःखी होते. कैकई आणि रावणाचा त्यामुळेच ती राग राग करताना पहावयास मिळते. मुळात ही स्त्री अतिशय धार्मिक आणि श्रद्धाळू आहे. त्यामुळे सर्व देव–देवता, संत यांच्याबद्दल गाताना ती हळवी झालेली दिसते. त्यांच्या कथा तिला खूप चांगल्या अवगत आहेत हेही जाणवते. विठ्ठल रूक्मीणीला तर ती माय–बापाच्या रूपातच पहाते. आळंदी, पंढरपूरचे वर्णन मनापासून करते. सर्व देव–देवतांच्या आणि संतांच्या वर्णनाबरोबरच ती दारातील तुळशीला देखील विसरत नाही. तुळशीला ती श्रेष्ठ पतिव्रता मानते. तिचे श्रेष्ठत्त्व मांडताना स्त्री म्हणते–

**''तुळसबाईवाणी पतिव्रता नाही कोणी। सावळा पांडुरंग तिच्या हक्काचा त्याला मणी।।**
**तुळशीच्या माळा पैसाला आठ–नऊ। सावळा पांडुरंग गळा घालती खाली लव।''** [12]

याशिवाय धार्मिक असलेल्या या स्त्रीमनावर वारकरी संप्रदायाचा खूपच प्रभाव आहे. त्यामुळे आपल्या गीतांमध्ये ती वारी, दिंडी, भजन, रिंगन, पंढरपूर, आळंदी, देहू, तुकोबा, ज्ञानेश्वर, एकनाथ, नामदेव, विठ्ठल, रूक्मिणी, पुंडलिक, चंद्रभागा यांचे अगदी मनापासून वर्णन करते.

सासर आणि माहेर हे स्त्री जीवनातील दोन अविभाज्य भाग. दोन मनं, दोन कुटुंब, दोन घर, दोन गावं एकमेकांशी स्त्रीमुळे, तिच्या विवाहामुळे कायमची जोडली जातात. याचे वर्णन पुढील स्त्रीगीतातील स्त्री अतिशय कल्पकतेने आणि सुंदर प्रतिमांचा वापर करून करते म्हणजे येथील स्त्रीमन कल्पक आहे असेही म्हणता येईल. ती म्हणते–

**''कृश?ष्णा मिळाली गं कोयनेला। तसचं माझं माहेर बाई येवून मिळालं सासरला।।**
**एका आईच्या पोटी येवूनी, झाली ताटातुटी जन्मापासूनी।**
**सासर–माहेर नाव सांगुणी, आले नाते गहिवरूनी।।**
**बहिण भेटली बहिणीला, कृष्णा मिळाली कोयनेला।**
**सासर–माहेर सांगुणी, शतजन्म ही पुण्याई ।।**
**घेऊन आली कृष्णामायी, आले नाते गहिवरूनी।**
**सुवासिनीच्या मितीला, कोयनेचं पाणी, कृष्णेचं पाणी।।**
**झाले एकरूप बाई, झाले एकरूप बाई।''** [13]

सासर माहेर म्हणजे दोन नद्यांचा संगम आहे. जसा कृष्ण कोयनेचा संगम होवून त्यांच पाणी एकरूप होवून जाते, तसं आपलं माहेर आणि सासरं एकमेकांत मिसळून एकरूप झाले आहे. आपल्याला आपलं सासर, माहेर दोन्हींचा अभिमान वाटतो आणि आपल्या सासर माहेरचा उल्लेख करताना गौरव वाटतो असे या गीतातील वर्णन स्त्रीच्या कल्पकतेचा प्रत्यय देणारे आहे.

सासुरवाशिण असलेले स्त्रीमन आपल्या माहेरच्या माणसांच्या आणि नव–याच्या सुखाचं मागणं ईश्वराकडे मागताना दिसते. तशीच अडाणी असलेली बहीण आपल्या श्रीमंत भावाला राखी बांधून घेण्याची विनवणी करताना अतिशय समंजसपणे म्हणते–

"नारळी पौणिमेचा सण वर्षाचा, आले मी रे लांबून।
ये भाऊराया राखी घे रे बांधून, राखी घे रे बांधून।
मी तर आहे खेडयामधली, आहे अडाणी नाही शिकलेली,
तुझ्या रे नावाला मी जपलेली, ये भाऊराया राखी घे रे बांधून।
शिक्षणावरती कामगार मोठा, तुला कशाचा नाही रे तोटा।
देही प्रेम, नको तुझ्या नोटा, ये भाऊराया राखी घे रे बांधून।
चोळी काकनं मागणार नाही, साडी साठी मी रूसणार नाही,
राखी बांधल्यावर थांबणार नाही, ये रे भाऊराया राखी घे रे बांधून,
आले मी रे लांबून, ये भाऊराया, राखी घे रे बांधून।।" [14]

आपल्या भावाने राखी बांधून घ्यावी, बाकी त्याच्याकडून आपली काहीच अपेक्षा नाही. बहिण म्हणते मला तुझे प्रेम हवे आहे. तुझ्या नोटांमध्ये मला काहीही रस नाही. मी खेडयातील, अडाणी असले तरी मी तुझ्या नावाला आणि प्रतिष्ठेला जपलेले आहे. त्याला बाधा येईल असं काहीच केलं नाही व करणार नाही तेव्हा तू राखी बांधून घे. तेवढयासाठी मी दूरवरून आले आहे. चोळी, बांगडया, साडी हे मला काहीही नको आहे व यासाठी मी तुझ्याकडे हट्ट करणार नाही, रूसणार नाही. फक्त तू राखी बांधून घे कारण त्यासाठीच मी लांबवरून आले आहे. या गीतातील बहिणीचे भावाला विनविणे आपल्याला हेलावून टाकणारे आहे. आणि बहिणीच्या समंजसपणाची जाणिव करून देणारे आहे.

अशिक्षित असलेले स्त्रीमन निसर्गातील चमत्कारांना देवाची करणी, किमया म्हणते. आणि देव काय काय किमया करतो त्याचे वर्णन करते ते वर्णन तिच्या अचूक निरीक्षणाची जाणिव करून देणारे आहे.

"देवा तुझी काय करणी, नारळाच्या आत पाणी। ऊस वाकडा–तिकडा, आत साखरेचा खडा।।
फणसाच्या अंगी काटे, आत अमृताचे साठे। काटे केतकीच्या झाडा, आत सुंदर केवडा।।
वरी माशांचे घोंगण, आत मदाचे ठेवण। देवा तुझी काय करणी, नारळाच्या आत पाणी।"[15]

देवाची म्हणजेच निसर्गाची किमया की नारळात पाणी आहे, वाकडा तिकडा ऊस आहे, पण त्याच्या आत साखरेचा खडा आहे. फणसाच्या अंगी काटे असले तरी आत अमृताचे साठे आहेत. केतकीच्या झाडाला काटे आहेत पण आत सुंदर केवडा आहे. या सगळया किमया आहेत याची जाणिव स्त्री या गीतातून व्यक्त करते आहे. हा तिच्या अचूक निरीक्षणाचा परिपाक आहे.

स्त्रीलोकगीतातून दिसणारे स्त्रीमन ग्रामसंस्कृती, कृशिसंस्कृतीशी एकरूप झालेले दिसते. त्यामुळेच ही स्त्री सुगीच्या दिवसात कशी लगबग असते. संपूर्ण कुटुंब, घरदार, कामात कसे मग्न असते, याचे वर्णन करते आणि सर्वांनी एकत्र मिळून, मिसळून काम केले तर कामाचा आनंद घेता येईल, असा अतिशय महत्त्वपूर्ण विचार हे स्त्रीमन मांडते. सुगीचे दिवस म्हणजे आनंदाचे दिवस अशी तिची भावना असलेली पहावयास मिळते.

याशिवाय वरील स्त्रीगीतांमधील स्त्रीमन माहेर, दागिणे यात गुंतलेले पहावयास मिळते. त्यामुळे अनेक स्त्रीगीतांमध्ये माहेर, दागिणे यांचे वर्णन आलेले पहावयास मिळते.

स्त्रियांना विनोदाची जाण आहे, त्यांच्याकडेही विनोदबुध्दी आहे. याचा प्रत्यय लग्नसमारंभाच्या वेळी म्हटल्या जाणा–या रूखवत गीतांमधून येतो. उदा.

"आला आला रूखवत, रूखवतावर होत आलं। माझ्या विहिणबाईच्या तोंडाला मांजर भेलं,
अन् टेंभूर्णीच्या खालतं जाऊनं मेलं।।
आला आला रूखवत त्यावर चहाची किटली,
नवरा नवरी सिनेमा बघायला सुटली तर मधेच फिलीम तुटली.।।
आला आला रूखवत त्यावर होता बिबा, विहिणबाईंचा मोडला खुबा म्हणून डॉक्टर केला उभा.।।"
"आला आला रूखवत, रूखवतावर तांदुळ, विहिणबाईंच्या मागे कोंबडयाचा गोंधुळ ।।
आला आला रूखवत रूखवतावर होत्या चवल्या पावल्या, नवरीच्या कुरवल्या आरश्यातल्या भावल्या।
आला आला रूखवत रूखवतावर होती कटयार, आमचा नवरदेव मागतोय पाचशाची मोटार
आला आला रूखवत रूखवतावर होत पीठ, दिली असती मोटार पण रस्ता आहे का नीट?
आला आला रूखवत रूखवतावर होत गहू, तुम्ही देवून तर बगा, आम्ही नागरटीतनं नेवू। "[16]

स्त्रियांना विनोदाची जाण आहे, त्यांच्याकडेही विनोदबुद्धी आहे. याचा प्रत्यय लग्नसमारंभाच्या वेळी म्हटल्या जाणा–या वरील रूखवत गीतांमधून येतो. अर्थात या विनोदात सहेतुकता नसते. [17]

इतिहासातील महत्त्वाच्या घटनांची स्त्रीला माहिती असलेली दिसते आणि त्यातील काही घटनांचा तिला सार्थ

अभिमान असलेला दिसतो. उदा. हिरकणीला गडावरून परत जाण्यास उशीर झाला होता. शिवाजी महाराजांच्या आदेशानुसार सूर्यास्तानंतर कुणालाही गडावरून जाता येणार नाही. त्यामुळे हिरकणीला कोणत्याही दरवाज्यातून जावू दिले जात नाही. तिचे छोटे बाळ घरी असल्यामुळे ती खूप विनवणी करत होती. आपल्या बाळाच्या काळजीने ती व्याकुळ होती म्हणून ती कोणत्याही दरवाजाने न जाता जिथे रक्षक नाहीत अशा ठिकाणाहून काटयाकुटयातून मार्ग काढत रायगडावरून खाली उतरते. पाय निसटला तर साक्षात मृत्यू पण बाळाच्या ओढीने ती जाते. शिवाजी महाराजांना ही वार्ता समजल्यावर '**धन्य धन्य ती माता**' असे गौरवोद्गार महाराज काढतात. आणि हिरकणी गेली त्या वाटेवर बुरूज बांधतात आणि त्याला '**हिरकणी बुरूज**' असे नाव देतात. म्हणूनच स्त्री आपल्या मुलीचे वर्णन करताना म्हणते–

**''लेका गं परीस लेकं कशानं झाली ऊनी, नेनंती गं बाळं माझी हिरा नव्हे ती हिरकणी''** [18]

आपल्या मुलीला हिरा न म्हणता हिरकणी म्हणते एवढा तिला इतिहासातील हिरकणीच्या पराक्रमाचा म्हणजे धाडसाचा अभिमान, स्वाभिमान असलेला पहावयास मिळतो.

### 03) समारोप :–

अशा प्रकारे इंदापूर तालुक्यातील स्त्रीलोकगीतांमधील स्त्रीमनाची विविध रूपे पाहिली असता ती अतिशय सोशिक, धार्मिक, श्रद्धाळू, परंपरागत जीवन जगणारी, मायाळू, प्रेमळ, समजदार, सारासारविचार करणारी, क्षमाशील, परोपकारी, प्रसंगी तेवढीच कणखरं आणि आपली माणसं, आपला परिसर याबद्दल अभिमान बाळगणारी दिसून येते. लग्नप्रसंगी म्हटली जाणारी गीते पाहिली असता येथील स्त्रीचे कौशल्य व चातुर्य आणि विनोदबुद्धी याची जाणिव होते. विविध सण–उत्सवप्रसंगी जे खेळ खेळले जातात त्यामध्ये येथील स्त्री मनोभावे सहभागी होऊन आनंद घेणारी आणि देणारी आहे. नागपंचमी सणाच्या वेळी खेळल्या जाणा–या फेर, फुगडीमधून तिची खिलाडूवृत्ती व मोठेपण दिसून येते. जत्रा–यात्रा, लग्नसमारंभ यामध्ये मनापासून सहभाग घेणारी दिसते. या सगळयातील तिचा उत्साह अतिशय प्रेरणादायी आहे. ती अतिशय उत्साही आहे तशीच ती तेवढीच संयमी आणि सहनशील असलेली पहावयास मिळते. सर्वांसाठी परिश्रम करणारी स्त्री पत्नी, मुलगी, यापेक्षा आई अधिक आहे याचाही प्रत्यय येतो. अशा अनेक गुणांचे मिश्रण असलेले स्त्रीमन या स्त्रीलोकगीतांमधून पहावयास मिळते.

### 04) संदर्भ :–


1. खबाले राहिबाई हरिदास, मौजे शहा, ता. इंदापूर
2. बंडगर रेखा रामदास, मौजे मदनवाडी चौफुला, ता. इंदापूर
3. जाधव शेवंताबाई, मौजे शेळगाव, ता. इंदापूर
4. मिसाळ शेसाबाई रामचंद्र, मौजे बिजवडी, ता. इंदापूर
5. तनपुरे लुपमुद्रा मोहन, सावतामाळीनगर, ता. इंदापूर
6. जेडगे संगीता नानासाहेब, मौजे कालठण नं 1, ता. इंदापूर.
7. शिंदे राधाबाई शंकर (श्रीमती) मौजे बावडा, ता. इंदापूर
8. आवटे लता रामदास सावतामाळीनगर, इंदापूर
9. आवटे लता रामदास, सावतामाळीनगर, इंदापूर
10. सलमपुरे सुनिता सतिश, मौजे कालठण नं 1, ता. इंदापूर
11. जगदाळे विजया ज्ञानदेव, मौजे वरकुटे बु।। ता. इंदापूर
12. हेगडे मैनाबाई पांडुरंग, मौजे रामकुंड, ता. इंदापूर
13. शिंदे आशाबाई एकनाथ, मौजे शिंदेवस्ती, ता. इंदापूर
14. जाधव मथुताई (श्रीमती) मौजे निमगाव केतकी, ता. इंदापूर
15. कुबेर मनिषा, इंदापूर
16. बोबडे संगीता हनुमंत, मौजे गलांडवाडी नं 2, ता. इंदापूर
17. डॉ. विश्वनाथ शिंदे, 'लोकसाहित्यमीमांसा' भाग 2,, स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे, 2006, पृ. 206.
18. पवार मालन कांतीलाल, मौजे गुलाबनगर, ता. इंदापूर